Est. Sept 1994

2(f) & 12 (B): ...

Hanuman Shikshan Prasarak Mandal, Sonpeth's
LATE RAMESH WARPUDKAR ARTS, COMMERCE & SCIENCE
COLLEGE, SONPETH. DIST. PARBHANI 431516 (MS)
NAAC Accredited with Grade- B
(Affiliated to: Swami Ramanand Teerth Marathwada University, Nanded)
Ph. (02453) 240 142 Fax. (02453)240 142 Principal: 09423 779 000
Web: www.warpudkarcollege.com Email:lrwcsnpt@rediffmail.com./shreyavasant2010@gmail.com

Shri. P.R. Kadam
President

Dr. V.D. Satpute
Principal

# Departmental Activity Report

- Name of the Department: marathi Language conservation Fortnight

1. Name of the Activity: marathi Language
2. Date: 22/01/2022
3. Place & Time: Department of marathi
4. Objectives of the Programme: Tracing the Rise of the Bhakti Sampradaya in the marathi language
5. Guests/Resource Persons: Dr. Datta Shinde
6. Abstract of the Programme: An analysis of how marathi language was enriched by Bhakti sampradaya
7. Total Beneficiaries: 58
8. Achievements/ Outcomes: Students and citizens were introduced to the work of saints

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar
(ACS) College, Sonpeth
Dist. Parbhani (MS)

हनुमान शिक्षण प्रसारक मंडळ सोनपेठ संचलित

# कै. रमेश वरपुडकर महाविद्यालय, सोनपेठ, जि. परभणी

मराठी विभाग /समिती

शैक्षणिक वर्ष : २०२१-२२

| भाग – अ | | |
|---|---|---|
| उपक्रम / कार्यक्रमाचे क्रमांक | | 07 |
| उपक्रम / कार्यक्रमाचे नाव | | मराठी भाषा पंधरवडा- |
| दिनांक- | | 22/01/2022 |
| उपक्रम / कार्यक्रमाचे स्वरूप | | मराठी भाषेला समृद्ध भक्ती संप्रदायाने केले. प्रा० दत्ता शिंदे. |
| उद्देश | १ | मराठी भाषेचे आदिम स्थान शोधणे. |
| | २ | मराठीतील काव्याचे सौंदर्यमूल्य तपासणे. |
| | ३ | मराठी भाषेतील भक्ती संप्रदायाचा उदय शोधणे. |
| | ४ | मराठी संत साहित्य आणि भक्ती संप्रदाय. |
| | ५ | |
| प्रमुख पाहुणे / मार्गदर्शक / व्याख्याते | | प्रा० दत्ता शिंदे. |
| उद्घाटक | | डॉ० बा.मुं. कारे. |
| ठिकाण | | अभ्यासी संकेत स्थळ. |
| उपस्थिती | विद्यार्थी | 36 |
| | कर्मचारी | 20 |
| | इतर | 02 |
| | एकूण | 58 |

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar
(ACS) College, Sonpeth
Dist. Parbhani (MS)

मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा केला. कोवीड-१९ च्या प्रादुर्भावा मुळे आभासी स्वरूपात स्थळावर प्रा. दत्ता शिंदे - मराठी विभाग संत तुकाराम महाविद्यालय परभणी येथील अतिरिक्त अभ्यास प्राध्यापक यांचे सुमधुर व्याख्यान झाले.

कार्यक्रमाच्या सुरवातील प्रास्ताविक डॉ. सा. द. सोनसळे यांनी केले तर कार्यक्रमाचे सूत्र संचलन प्रा. सखाराम कदम यांनी केले. प्रा. दत्ता शिंदे आपल्या व्याख्यानात म्हणाले, " मध्ययुगीन कालखंडात निर्माण झालेले जे विविध भक्तीसंप्रदाय आहेत त्यात नाथ संप्रदाय महानुभाव संप्रदाय व वारकरी संप्रदाय हे अत्यंत महत्वाचे संप्रदाय असून या संप्रदायाने खऱ्या अर्थाने मराठी भाषा ही समृध्द केली. नाथ संप्रदाय हा या काळातील महत्वाचा संप्रदाय असून वारकरी संप्रदायातील संत ज्ञानेश्वर यांची परंपरा ही आपल्याला नाथ संप्रदाया पर्यंत दिसते.

उपक्रम / कार्यक्रमाची उपयुक्तता

- मराठी भाषेला समृध्दीच्या दृष्टीने नेणे.
- संतांचे साहित्य समजावून त्याने विश्लेषण करून सांगणे. यामुळे विद्यार्थी आणि नागरिकांना संतांच्या कार्याचा परिचय झाला.

भाग - क

उपक्रम / कार्यक्रमाचे खर्चाचे विवरण

| अ.क्र | खर्च करण्यात आलेल्या वस्तूचे विवरण | आलेला खर्च (रु.) | शेरा |
|---|---|---|---|
| | —Nil— निरंक | —Nil— | अतिशय सुंदर कार्यक्रम. नेट मध्ये व्यत्यय येत होता. |
| एकूण खर्च | —Nil— | —Nil— | |

अहवाल सादर करणाऱ्या समिती / विभाग मराठी.

| पद | नाव | स्वाक्षरी |
|---|---|---|
| समिती अध्यक्ष/ विभाग प्रमुख | डॉ. बा.मुं. कावळे. | |
| समन्वयक | — | |
| सदस्य | डॉ. सा.द. सोनसळे<br>प्रा. एस.बी. कदम. | |

अहवाल सादर केल्याचा दिनांक : / / २०

टीप: सोबत कार्यक्रमाचे GEO TAGGED फोटो व वर्तमानपत्रातील बातम्या जोडाव्यात

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar
(ACS) College, Sonpeth
Dist. Parbhani (MS)

मराठी भाषेला समृद्ध भक्ती संप्रदायाने केले.

— प्रा. दत्ता शिंदे

पुढे ते म्हणाले मध्ययुगीन कालखंडात निर्माण झालेले जे विविध भक्तिसंप्रदाय आहेत त्यात नाथ संप्रदाय, महानुभाव संप्रदाय व वारकरी संप्रदाय हे अत्यंत महत्त्वाचे संप्रदाय असून या संप्रदायाने खऱ्या अर्थाने मराठी भाषा ही समृद्ध केली. नाथ संप्रदाय हा या काळातील महत्त्वाचा संप्रदाय असून वारकरी संप्रदायातील संत ज्ञानेश्वर यांची परंपरा ही आपल्याला नाथसंप्रदाय पर्यंत दिसते. त्यांचे गुरू निवृत्तीनाथ हे नाथ संप्रदायी होते. त्या बरोबरच यादव काळात निर्माण झालेला महानुभाव संप्रदाय हा अत्यंत महत्त्वाचा संप्रदाय असून या संप्रदायाने जाणीवपूर्वक मराठी भाषेत ग्रंथनिर्मिती केली.

श्रीचक्रधर यांनी तर आपल्या शिष्यांना स्पष्ट आदेशच दिला होता की महाराष्ट्रदेशी असावे म्हणजेच संस्कृतपेक्षा प्राकृत भाषेतूनच आपण लेखन करावे असे ते म्हणाले. महानुभव पंथ पंचकृष्ण मानणारा संप्रदाय असून या पंथाने खऱ्या अर्थाने मराठी भाषेचे दालन समृद्ध केल्याचे ते म्हणाले. मराठीत गद्य साहित्याची मुहूर्तमेढ या संप्रदायाने रोवली. मराठीतील पहिले चरित्र मराठीतील पहिले कथाकाव्य, मराठीतील पहिली कवियत्री, मराठीतील आद्य गद्यग्रंथाचे निर्माते या पंथाने दिले. संकलन,संशोधन व संपादन कसे करावे हे या पंथाने शिकवले . छोटी छोटी वाक्य, घरगुती स्वरूपाची भाषा, भाषेत असणारा गोडवा रसाळपणा ही या कालीन मराठी भाषेची वैशिष्ट्ये असल्याचे ते पुढे म्हणाले.

वारकरी संप्रदाय हा भक्ती संप्रदाय असून या संप्रदायाने माणसाच्या वर्तनावर व साधन शुचितेवर भर दिला. नीतिमत्ता व शुद्ध आचरणावर भर देणारा हा पंथ आहे. हा पंथ अद्वैती मताचा असून विठ्ठल भक्तीला महत्त्व देणारा असल्याचे ते म्हणाले. या पंथाचा नामस्मरणावर भर आहे. माणसाच्या जन्मापेक्षा त्याच्या कर्तुत्वाला महत्त्व देणारा हा पंथ असल्याचे त्यांनी सांगितले.त्यामुळेच वारकरी पंथात आपल्याला अठरापगड जातीतील सर्व संत निर्माण झाल्याचे ते सांगतात. संत नामदेव, संत ज्ञानेश्वर, संत एकनाथ, संत तुकाराम, संत चोखामेळा, संत सावतामाळी, संत नरहरी सोनार, संत गोरा कुंभार, संत बंका महार, संत जनाई, संत मुक्ताई, संत बहिणाबाई इत्यादी अनेक कवियत्री व कवी वारकरी पंथाने मराठी साहित्याला दिले. या सर्व संतांनी ओवी, अभंग, गौळणी, भारुडे,पदे, आरत्या व भूपाळी इत्यादी रचनाप्रकारतून मराठी वांग्मय समृद्ध केले.

संत ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी सारख्या तत्वज्ञानपर ग्रंथात मराठी भाषेचे वैभव त्यांनी त्यातून दाखवले. संत नामदेवांनी भागवत धर्माची पताका पंढरी पासून पंजाब पर्यंत तर नेलीच पण संत नामदेव हे मराठीतील पहिले आत्मचरित्रकार, पहिले भावकवी, आपल्या शिष्यांची समाधी पंढरपूरला बांधणारे गुरु... अशी त्यांच्या व्यक्तिमत्वाची कितीतरी रुपे असल्याचे त्यांनी नमूद केले. त्यांनी कीर्तनाच्या माध्यमातून जनजागृती केल्याचे व अभंगवाणीच्या रूपाने मराठी भाषा समृद्ध केल्याचे त्यांनी सांगितले. संत एकनाथांनी पंधराव्या शतकात मराठीच्या पडत्या काळात तिला सावरले तर भाषाप्रभू संत तुकारामांनी मराठी भाषेमध्ये सुमारे पाच हजार अभंगाची निर्मिती करून मराठी भाषेला समृद्ध केले. 'बुडती हे जन न देखवे डोळा| म्हणून येतो कळवळा|| या कळवळया पोटी संत तुकारामांनी लेखन केल्याचे ते म्हणाले. एकंदरीत मध्ययुगीन कालखंडात निर्माण झालेले हे संत वांग्मय मराठी भाषेचे वैभव असल्याचे ते म्हणाले.

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar
(ACS) College, Sonpeth
Dist. Parbhani (MS)

या कार्यक्रमासाठी संस्थेचे अध्यक्ष परमेश्वर कदम, प्राचार्य डॉ.वसंत सातपुते, डॉ. पाटील एम बी, संतोष रणखांब,

# भक्ति संप्रदायाने मराठी भाषेला समृद्ध केले-डॉ.शिंदे

**सोनपेठ/प्रतिनिधी**

येथील कै. रमेश वरपुडकर महाविद्यालयात १४ जानेवारी ते २८ जानेवारी मराठी भाषा संवर्धन पंधरवडा संपन्न होत आहे. त्या निमित्ताने विविध कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. सहावे पुष्प गुंफतांना संत तुकाराम महाविद्यालय, परभणी येथील मराठी विभाग प्रमुख व संशोधक, मार्गदर्शक डॉ. दत्ता शिंदे यांनी 'संत साहित्याचे मराठी भाषेला योगदान' या विषयावर व्यक्त होताना हे प्रतिपादन केले.



पुढे बोलताना ते म्हणाले मध्ययुगीन कालखंडात निर्माण झालेले विविध भक्तिसंप्रदाय आहेत त्यात नाथ संप्रदाय, महानुभाव संप्रदाय व वारकरी संप्रदाय हे अत्यंत महत्त्वाचे संप्रदाय असून या संप्रदायाने खऱ्या अर्थाने मराठी भाषा ही समृद्ध केली. नाथ संप्रदाय हा या काळातील महत्त्वाचा संप्रदाय असून वारकरी संप्रदायातील संत ज्ञानेश्वर यांची परंपरा ही आपल्याला नाथसंप्रदाय पर्यंत दिसते. त्यांचे गुरू निवृत्तीनाथ हे नाथ संप्रदायी होते. त्या बरोबरच यादव काळात निर्माण झालेला महानुभाव संप्रदाय हा अत्यंत महत्त्वाचा संप्रदाय असून या संप्रदायाने जाणीवपूर्वक मराठी भाषेत ग्रंथनिर्मिती केली. श्रीचक्रधर यांनी तर आपल्या शिष्यांना स्पष्ट आदेशच दिला होता की महाराष्ट्रदेशी असावे म्हणजेच संस्कृतपेक्षा प्राकृत भाषेतूनच आपण लेखन करावे असे ते म्हणाले. या कार्यक्रमासाठी संस्थाध्यक्ष परमेश्वर कदम, प्राचार्य डॉ. वसंत सातपुते, डॉ. पाटील एम बी, संतोष रणखांब, डॉ. बालासाहेब काळे, डॉ. सा. द. सोनसळे, प्रा. सखाराम कदम प्राध्यापक वृंद व अनेक विद्यार्थी तसेच भाषाप्रेमी नागरिक उपस्थित होते.

डॉ. बालासाहेब काळे, डॉ. सा.द.सोनसळे, प्रा. सखाराम कदम प्राध्यापक वृंद व अनेक विद्यार्थी तसेच भाषाप्रेमी नागरिक उपस्थित होते.

प्रोफेसर,डॉ.बालासाहेब काळे.

मराठी विभाग प्रमुख.

डॉ.वसंत सातपुते

प्राचार्य

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar
(ACS) College, Sonpeth
Dist. Parbhani (MS)